
ISSN No 2347-7075
Impact Factor- 7.328
Volume-2 Issue-21

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur(M.S), India

Young Researcher Association

Scanned with OKEN Scanner

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# मराठी साहित्यातील पर्यावरणीय दृष्टीकोन

**डॉ. संतोष जबाजी लगड[1] डॉ. भारती मच्छिंद्र काळे[2]**
[1]भूगोल विभाग, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत.
[2]मराठी विभाग, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत.
*Corresponding Author-* **डॉ. संतोष जबाजी लगड**
Email- lagad1980@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7052478

**प्रस्तावना**

पर्यावरण संधारण हा विषय आज जागतिक स्तरावर ज्वलंत विषय आहे. मानवी जीवनच नव्हे तर संपूर्ण जीवसृष्टी पर्यावरणातील विघातक बदलामुळे हादरून गेली आहे. माणसाने जंगले व्यापली आणि घरे बांधली. आज मोठ्या प्रमाणावर जंगले नष्ट झाल्यामुळे बिबट्यासारखे प्राणी मानवी वस्तीत येऊन धुमाकूळ घालत आहेत. हत्ती, गवे हे प्राणी शेतातील पिके फस्त करताहेत. निसर्गात मानवी हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे.माणूस हा निसर्गाचा एक घटक आहे त्यामुळे त्याचे भावविश्व निसर्गापासून अलिप्त राहू शकत नाही. कृषी संस्कृतीचा शोध लागल्यापासून मनुष्यप्राणी निसर्गाच्या सान्निध्यात वास करत आहे. माती, हवा, पाणी,पशू, पक्षी, डोंगर, नदी- नाले, दऱ्या- खोरे,वनस्पती आदी सर्व घटकांचा समावेश निसर्ग या संकल्पनेत येतो. निसर्गाचा मानवी जीवनावर जसा परिणाम होतो, तसाच परिणाम मानवी जीवनाचा निसर्गावर होत असतो. "माणसाच्या जैविक आणि सांस्कृतिक पर्यावरणाचे कलात्मक, क्रीडात्मक संवेदना म्हणजे त्याचे ललित संवेदन अशा प्रकारचे ललित संवेदन व्यक्त करणारी निर्मिती म्हणजे 'पर्यावरणीय ललित साहित्य' असे म्हणता येईल". मराठी साहित्य ही त्याला अपवाद नाही. मराठी साहित्यातील संत साहित्यापासून आधुनिक साहित्यनिर्मिती पर्यंत पर्यावरणाचा विचार व्यक्त झालेला दिसतो.

**संत साहित्यातून व्यक्त होणारे पर्यावरण**

मराठी संत साहित्यातून व्यक्त होणारे पर्यावरण हे तात्विक व नैतिक स्वरूपाचे आहे. प्रापंचिकांना उपदेश करतांना सर्व संतांनी तत्कालीन समाज जीवनातील आजूबाजूच्या परिसरातील पशू, पक्षी, प्राणी, वनस्पती इत्यादी वैशिष्ट्यांचा सहज सुंदर दाखला देत निसर्गाचे महत्त्व विशद केले आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्ययात याविषयीचे वर्णन केले आहे.

जेथे अमृताचेनि पाडे | मुळेही सकट गोडे |जोडती दाट
झाडे सदा फळती ||
पाऊला पाऊला उदके | वर्षा काळीही परिचोखे | निझरि
का विशेखे सुलभ जेय |

निसर्गाच्या सनिध्यात सर्वांपासून दूर जंगलात माणसाचे मन शांत होते. माणूस स्वतःशी संवाद साधू शकतो. आजच्या धावपळीच्या आणि कोलाहलाच्या वातावरणात आपण स्वतःशी संवाद साधू शकत नाही, त्यामुळे मानसिक ताणतणाव वाढवून मनोविकारांना माणूस बळी पडतो. तुकाराम महाराजांच्या काळात आजसारखी परिस्थिती नव्हती तरीही, निरोगी मनासाठी वनांची पशुपक्ष्यांच्या सहवासाची आवश्यकता कशी असते हे त्यांनी आपल्या अभंगातून व्यक्त केले आहे.

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे | पक्षीही सुस्वरे
आळवीही ||

एकूणच काय तर निसर्गाचे मानवी जीवनातील महत्त्व सांगितले आहे. 'जगा आणि जगू द्या' हा मूलभूत संदेश संतांनी आपल्या काव्यातून दिलेला दिसतो. जो आजच्या काळाची नितांत गरज आहे.

**मराठी कवितेतून व्यक्त होणारे पर्यावरण**

मराठी काव्यात विविध विषयावर कविता आहेत. त्याचप्रमाणे निसर्गावर ही मोठ्या प्रमाणात कविता केलेल्या दिसून येतात. केशवसुती यांनी पर्यावरणीय संवेदनात सामाजिक उद्बोधनाचा सुर उमटवला तर, बालकवींनी एक स्वतंत्र निसर्गदृष्टी त्यांच्या अंतर्गत कलहाच्या दाबातून निर्माण केली. या निसर्ग कवितेच्या आधारे नैसर्गिक पर्यावरणाचा शोध घेण्याचा प्रयत्न माधव ज्युलियन, बा.सी.मर्ढेकर, बा.भ.बोरकर, मंगेश पाडगावकर, ना.धो.महानोर, इंद्रजीत भालेराव, इंदिरा संत, अनुराधा पोतदार, शरणकुमार लिंबाळे इत्यादी यासारख्या कवींच्या कवितेमधून व्यक्त होताना दिसतो. महानोर हे निसर्गाशी रानांशी भावनिक नाते सांगतात. 'नभ आणि भुई' यांचा संबंध व्यक्त करताना ते म्हणतात,

"ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे
आणि ह्या मातीतून चैतन्य गावे"

निसर्ग आणि मानव यांचे भावनिक नाते इथे दिसते. महानोर यांनी आपल्या काव्यातून निसर्गाचे अस्सल दर्शन घडवलेले आहे. महानोरांची कविता ही खऱ्या

अर्थाने निसर्ग कविता ठरते. ना.धो. महानोर यांच्या कवितेविषयी डॉ. नागनाथ कोत्तापल्ली म्हणतात, 'महानोर यांची कविता म्हणजे रानातले सुखदुःख आणि सगळे रान आपल्या कवितेमधून साकार करणारे रानातले रंग, गंध आणि कांती महानोरांना वेडी करते महानोर यांच्या नैसर्गिक पर्यावरणीय संविधानात प्राकृतिक समरसता उत्कटपणे व सगळ्या रंगगंधासकट प्रकट होते'. इंद्रजीत भालेराव यांच्या 'पीकपाणी' या काव्यसंग्रहातून नैसर्गिक पर्यावरणाचे अस्सल रूप साकारलेले आहे. शेतकऱ्याच्या जीवनातील निसर्गाला विशेष महत्त्व आहे. निसर्ग हा लहरी आहे त्याचे परिणाम मानवी जीवनावर होत असतात. निसर्गाच्या या लहरीपणाविषयी कवी म्हणतात,

'आलं आलं हे आभाळ
नाही वारं वावधान
व-ही बसलय हाटून
खाली फुलोऱ्यात धान
आलं आलं रे आभाळ'

भालेरावांनी आपल्या कवितेतून निसर्गाचा लहरीपणा, गाव आणि निसर्ग यांचे अतूट नाते, शेतकऱ्यांच्या जीवनात निसर्गाचे स्थान, कृषीसंस्कृती, दुष्काळ, ऋतुचक्र यांचे वर्णन केलेले आहे. अनुराधा पाटलांच्या कवितेत विशेषतः पाऊस आभाळ या निसर्ग घटकांना विविधरंगी प्रतिमांचे रूप येते. आभाळ, माती, वारा अशी निसर्ग रूपाची विविध साथ कवयित्रीला लाभलेली दिसते. अंजली कीर्तने यांच्या 'शहराच्या पोटात' या कवितेतून पर्यावरणीय संवेदन व पर्यावरणीय प्रबोधन असा विषय मांडला आहे. एकूणच कवितेच्या माध्यमातून समाजाला पर्यावरण जाणीवजागृती करण्याचे काम अलीकडच्या मराठी कवींनी केलेले दिसून येते.

**मराठी कथेतून व्यक्त होणारे पर्यावरण**

कथा वाङ्मयातूनही नैसर्गिक पर्यावरणाचे विविध चित्रण झालेले दिसते.ग.ल. ठोकळ यांच्यापासून निसर्गाचे वर्णन कथेत आलेले दिसत असले तरी, मराठी कथेतील निसर्गचित्रण अधिक कलात्मक झाले ते व्यंकटेश माडगूळकरांपासून 'वाटा' व 'गोष्टी घराकडील' या त्यांच्या लेखातून ते चित्रित होताना दिसते. याशिवाय उद्धव शेळके, आनंद यादव, अरविंद गोखले यासारख्या लेखकांच्या कथा माध्यमातून निसर्ग वर्णन आलेले आहे. मोहन पाटील यांच्या 'लिगाड आणि खांदेपालट' या कथासंग्रहातून दुष्काळाचे वर्णन आलेले आहे. दुष्काळाचा सामाजिक स्थितीवर होणारा परिणाम याचा शोध यामधून घेतलेला दिसतो. मारुती चित्तमपल्ली यांच्या 'रानवाटा' तून जंगल संस्कृती, विविध प्रकारचे पशु-पक्षी यांचे सूक्ष्म निरीक्षण नोंदवले आहे. निसर्गाचे मनोहारी व सुंदररूप वर्णन करण्याबरोबरच, निसर्गाचे रौद्ररूप सुद्धा साकारलेले आहे. 'पाणी पाणी' या कथेतून पाणी प्रश्नावर चिंतन केलेले आहे. पाण्याच्या वापरा संदर्भात काही सूचना केलेल्या आहेत. मराठी कथेतील काही नवलेखकांनी सामाजिक परिस्थितीचे भानराखत पर्यावरण व त्याचे संवर्धन यासारख्या विषयाला महत्त्व देऊन समाज जागृतीचे काम करताना दिसून येतात. अगदी जंगल तोडी पासून ते शहरीकरणात झालेले बदल, शेती विषयक प्रगती व अतिरेकी रासायनिक खतांचा दुष्परिणाम, लोकसंख्या वाढ, आरोग्य, यासारख्या विषयावर भाष्य करून पर्यावरणीय ऱ्हासास मानव कसा जबाबदार आहे हे व्यक्त केलेले दिसून येते.

**मराठी कादंबरीतून व्यक्त होणारे पर्यावरण**

मराठी साहित्यातील कादंबरी या वाङ्मय प्रकारातून प्रामुख्याने विश्वास पाटील, रा.र.बोराडे, शंकर सखाराम, आनंद यादव, उद्धव शेळके, बंकट पाटील, सदानंद देशमुख आदी साहित्यिकांनी नैसर्गिक पर्यावरणासंदर्भात लेखन केलेले दिसून येते. रा.र. बोरडे यांची 'इथे होते एक गाव' या कादंबरीतून भूकंपग्रस्तांचे जीवन साकार झालेले आहे. आनंद यादव यांच्या 'गोतावळा' मधून यंत्रसंस्कृतीमुळे कृषी संस्कृतीचा ऱ्हास होत चाललेला आहे असे वर्णन केलेले दिसते. विश्वास पाटील यांच्या 'पागीरा' मधून 'पाणी म्हणजे जीवन' तेच जर नष्ट झाले तर काय होईल यावर भाष्य केलेले आहे. शंकर खरात यांच्या 'एसईझेड' या कादंबरीतून वाढते शहरीकरण, प्रदूषण यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या यावर प्रकाश टाकला आहे. मराठी साहित्यातील नैसर्गिक पर्यावरणाचा शोध घेत असताना लक्षात येते की कृषी संस्कृतीचा होणारा ऱ्हास, लोपपावत चाललेली ग्रामसंस्कृती, निसर्गात घडणारे नाट्यपूर्ण बदल, सतत बदलणारे ऋतुचक्र, निसर्गाचा लहरीपणा, शहरीकरणाच्या आधुनिकीकरणामुळे निसर्गाचा होणारा ऱ्हास आदी बाबींचे चित्र मराठी कादंबरीच्या माध्यमातून व्यक्त केलेली आहेत.

**समारोप**

आज आधुनिक, संघनकीय युगात मानव स्वतःचे जीवन अधिक सुखाकडे घेऊन जात असताना मानवाचा निसर्गातील हस्तक्षेप वाढत आहे. तंत्रज्ञानाच्या साह्याने मानवाने नेत्र-दिपक प्रगती केली असली तरी दुसरीकडे नैसर्गिक आणि मानवनिर्मित पर्यावरणीय समस्यांनी मानवाला ग्रासून टाकले आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी मानव मोठ्या प्रमाणात पर्यावरणाचा ऱ्हास करत आहे, त्याचे दुष्परिणाम सर्व मानवजातील भेडसावतांना दिसून येत आहेत. पर्यावरणीय समस्यांची तीव्रता कमी करण्याचा साहित्यातून सतत प्रयत्न होताना दिसतो. पर्यावरणाच्या संरचनेचे स्वरूपाचे आणि त्याच्या विविध घटकांचे ज्ञान देऊन प्रत्येक व्यक्तीस एक जागरूक व जबाबदार नागरिक बनविणे गरजेचे झालेले आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे, म्हणूनच



Scanned with OKEN Scanner

शिक्षणाच्या सर्व स्तरावर आज पर्यावरण जाणीवजागृती शिक्षण अनिवार्य केले आहे.

**निष्कर्ष**

१.पर्यावरण व पर्यावरणाची आव्हाने याविषयी संवेदनशीलता,जाणीवजागृती आणि प्रबोधन समाजामध्ये निर्माण होईल.

२.शास्वत पर्यावरणीय गुणवत्ता टिकविण्यासाठी मदत व त्यासंबंधीच्या वृत्तीत वाढ होईल.

३.पर्यावरणीय समस्यांची तीव्रता कमी करण्यासाठी समाज प्रयन्त करेल.

४.दुष्काळ, जंगलतोड, प्रदूषण, वाढते औद्योगिकीकरण यासारखे विषय साहित्याच्या माध्यमातून मांडून जनजागृतीचे काम साहित्याने केलेले दिसून येते.

५.साहित्यातून भौगोलिक, पर्यावरणीय सहसंबंधाचे चित्रण आणि समाज प्रबोधन यांचा योग्य दुवा साधून साहित्याचे पर्यावरणीय महत्त्व कथा, कादंबरी, कविता, अभंग इत्यादीतून व्यक्त केलेले आहे.

**संदर्भ**

१.जाधव रा.ग.(१९९७).पर्यावरण प्रबोधन आणि साहित्य.साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

२.लिंबळे श. (१९९३). मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह, मधुराज पब्लिकेशन, पुणे.

३.गायकवाडवि. (२०१८). पर्यावरण साहित्य स्वरूप आणि समीक्षा. अक्षरदीप प्रकाशन, पुणे

४. कोतापल्ली ना. (२००५). ग्रामीण स्वरूप आणि शोध.स्वरूप प्रकाशन,औरंगाबाद.



Scanned with OKEN Scanner